INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

Peer Reviewed-Referred & Indexed Journal

February - 2020 Special Issue - 240 (B)

## Analysis of Maharashtra State Legislative Assembly Election 2019



**Executive Editors :**

Dr. Sandip Tundurwar
(HoD, PG Dept. of Political Science)
Shri. Binzani City College, Nagpur

Dr. Vakil Shaikh
(HoD, Dept. of Political Science)
Taywade College, Mahadula-Koradi, Dist.-Nagpur

**Chief Editor :**

Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

**Associate Editors :**

Dr. Sanjay Nakade
(HoD, Dept. of Political Science)
Dnyanesh Mahavidyalaya, Nawargaon

Dr. Balasaheb Jogdand
(PG Dept. of Political Science)
Sitabai Arts & Commerce College, Akola

Dr. Amar Bondre
(Dept. of Political Science)
VMV Com. JMT Arts & JJP Sci. College, Nagpur

Dr. Dinkar Chaudhari
(HoD, Dept. of Political Science)
Arts & Commerce College, Bhisi

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.625** **ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2020 Special Issue – 240 (B)

# Analysis of Maharashtra State Legislative Assembly Election 2019

**Executive Editors :**
Dr. Sandip Tundurwar
(HoD, PG Dept. of Political Science)
Shri. Binzani City College, Nagpur

Dr. Vakil Shaikh
(HoD, Dept. of Political Science)
Taywade College, Mahadula-Koradi, Dist.-Nagpur

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

**Associate Editors :**
Dr. Sanjay Nakade
(HoD, Dept. of Political Science)
Dnyanesh Mahavidyalaya, Nawargaon
Dr. Balasaheb Jogdand
(PG Dept. of Political Science)
Sitabai Arts & Commerce College, Akola
Dr. Amar Bondre
(Dept. of Political Science)
VMV Com. JMT Arts & JJP Sci. College, Nagpur
Dr. Dinkar Chaudhari
(HoD, Dept. of Political Science)
Arts & Commerce College, Bhisi

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 240 (B) : Analysis of Maharashtra State Legislative Assembly 2019
Peer Reviewed-Referred Journal
ISSN : 2348-7143
February-2020

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ चे विश्लेषण : एक दृष्टीक्षेप | डॉ. राजेंद्र बेलोकार | 08 |
| 2 | निवडणूक आयोग आणि महाराष्ट्राची चौदावी विधानसभा निवडणुक विश्लेषण | महेंद्र भगत | 12 |
| 3 | विश्लेषण–महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे | डॉ. संतोष डाखरे | 15 |
| 4 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ : विश्लेषण व निरीक्षण | डॉ. आनंद शिंदे | 21 |
| 5 | विधानसभा निवडणूक – २०१९ एक विश्लेषण | डॉ. राजेश्री कडू, डॉ. अश्विनी खापरे | 27 |
| 6 | २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा अन्वयार्थ | प्रा. कल्पना निंबार्ते | 31 |
| 7 | १४ वी विधानसभा निवडणूक : जनादेशाचा अन्वयार्थ | डॉ. अनंत आवटी | 36 |
| 8 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ "खंडित जनादेश" – विश्लेषण | डॉ. ममता पाथ्रीकर | 42 |
| 9 | १४ वी विधानसभा : खंडित जनादेश | डॉ. प्रशांत विघे | 46 |
| 10 | महाराष्ट्रातील विधानसभा सभेच्या निवडणूका व भवितव्य | प्रा. बबीता थुल | 51 |
| 11 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक – २०१९ मध्ये वंचित बहूजन आघाडी, डावे, दलित, शेकाप, जनसुराज्यपक्ष व ए.आय.एम.आय.एम. या पक्षाची कामगिरी | डॉ. छाया देशमुख | 58 |
| 12 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक विश्लेषण २०१९ निवडणूक रणनीती आणि डावपेच | डॉ. संगिता सोमवंशी | 64 |
| 13 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ विश्लेषण राजकीय स्थित्यंतरे आणि रणनीती व डावपेच | डॉ. प्रफुल्ल राऊत | 67 |
| 14 | १४ व्या महाराष्ट्र विधानसभेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रतिनीधीत्व | प्रा. शशिकांत पाटील | 72 |
| 15 | नव युवा आमदार आणि युवा मतदार : एक चिकित्सक अध्ययन (महाराष्ट्र विधानसभा २०१९ च्या संदर्भात) | डॉ. प्रतिभा टावरी | 79 |
| 16 | वंचित बहुजन आघाडी : वाटचाल व भवितव्य | डॉ. हिराचंद वेस्कडे | 85 |
| 17 | राजकीय पक्षांच्या उमेदवारीचे निकष आणि भूमिका | प्रा. विनोद मुडे | 89 |
| 18 | महाराष्ट्र विधानसभा निवडणुका व राजकीय पक्षाची भूमिका | डॉ. राजेंद्र झाडे | 95 |
| 19 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ : प्रमुख राजकीय पक्षांचे जाहीरनामे एक विवेचन | प्रा. एकनाथ मुरकुटे | 98 |
| 20 | निवडणुका आणि मतदारवर्तन | श्री. बंडु शेरके, डॉ. राजेंद्र मुद्दमवार | 103 |
| 21 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक : कलम – ३५६ आणि राज्यपालाची भूमिका | डॉ. संदीप बी. काळे | 107 |
| 22 | राज्याच्या शांसन व्यवस्थेत राज्यपालाची भूमिका | डॉ. हरीदास लाडके | 112 |
| 23 | राजकीय पक्षाच्या उमेदवारीचे निकष | राजेंद्र कुळमेथे | 114 |
| 24 | राजकीय पक्षाच्या उमेदवारीचे निकष | प्रा. प्रभाकर डोळस | 122 |
| 25 | सत्तासंघर्षात मित्र–तत्व, जनमताचा बळी... | डॉ. बा. रा. कत्तुरवार | 124 |
| 26 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक | डॉ. सरला मेश्राम | 127 |
| 27 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ चे विश्लेषणात्मक विवेचन | डॉ. प्रिया बोचे | 130 |

| | | | |
|---|---|---|---|
| 28 | मुरब्बी राजकीय नेतृत्वाची यशस्वी रणनीती | डॉ. रिता धांडेकर | 133 |
| 29 | महिलांचा राजकीय सहभाग महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या विशेष संदर्भात | प्रा. विजय कांडलकर | 138 |
| 30 | निवडणूक रणनिती आणि डावपेच | पौर्णिमा मेश्राम | 142 |
| 31 | महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुक आणि वंचित बहुजन आघाडीची भूमिका | डॉ.भगवान गरुडे | 147 |
| 32 | महांराष्ट्र विधानसभा निवडणूक विश्लेषण : २०१९१ (१४ वी विधानसभा : खंडीत जनादेश) | डॉ. अर्चना उमरकर | 149 |
| 33 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक–२०१९ : एक विश्लेषण | डॉ. वकील शेख | 152 |
| 34 | वणी विधानसभा मतदारक्षेत्रातील मतदार वर्तन : एक विश्लेषण | किरण कोंढेकर | 156 |
| 35 | विदर्भातील विधानसभा निवडणुक २०१९ राजकीय पक्षांचे स्थितीचे विश्लेशण | श्री. भास्कर वघाळे | 164 |
| 36 | विधानसभा २०१९ निवडणुकीतील महिलांची कामगिरी | डॉ. विमल राठोड | 178 |
| 37 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक : २०१९ बदलती सामाजिक समीकरणे | विवेक घोटाळे, मुक्ता कुलकर्णी | 182 |
| 38 | महिलांचा राजकीय सहभाग (२०१९ च्या राज्य विधानसभा निवडणूकीच्या संदर्भात) | डॉ. संजय नाकाडे | 190 |
| 39 | विदर्भातील भारतीय जनता पक्षाच्या प्रभावक्षेत्रातील कमी होणारा अवकाश | प्रा. किशोर नैताम | 193 |
| 40 | महाराष्ट्र विधानसभा २०१९ : दखलपात्र नोटा | डॉ. शरद सांबारे, डॉ. विवेक दिवाण | 207 |
| 41 | महाराष्ट्रातील फेरमांडणीचा प्रयोग : एक मुक्त चिंतन | संदीप तुंडूरवार | 212 |
| 42 | राजनैतिक दलों की वैचारिक निष्ठा एवं विचलन | डॉ. अनुप कुमार सिंह | 218 |
| 43 | महाराष्ट्र विधानसभा चूनाव २०१९ का विश्लेशण | डॉ. किशोर वासनिक | 221 |
| 44 | महाराष्ट्र विधानसभा चुनाव २०१९ एवं महिला उम्मीदवार | डॉ. दिप्ती चौरागडे | 226 |
| 45 | भारतीय राजनीति में महिलाओं की भूमिका : एक अध्ययन | डॉ. राजेंद्रप्रसाद पटले | 231 |
| 46 | MIM का राजनीतिक प्रभाव एवं राजनीति में योगदान | डॉ. समीना परवीन | 234 |
| 47 | २०१९ ची निवडणूक म्हणजे डावपेच व रणनीतीला उधाण | डॉ. संपदा कुल्लरवार | 238 |
| 48 | A Research Paper on Criteria for Selection of Candidates for Maharashtra Legislative Assembly Elections 2019 | **Dr. Pratibha Bhorjar, Mr. Aniket Deshmukh** | 242 |
| 49 | 14th Vidhansabha- Fractured Mandate | **Animesh Dongare** | 247 |
| 50 | Role of NOTA in Maharashtra Election : A Study of Assembly Election 2019 Results | **Khyatimaya Tripathy** | 250 |
| 51 | Maharashtra Power Conflict : Prospect and Future | **D. S. Shambharkar** | 256 |
| 52 | Maharashtra State Assembly Election 2019 : from Ideological to Experimental Coalition | **Dr. Pravin Bhagdikar** | 260 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.625, | February-2020
Special Issue 240 (B) : Analysis of Maharashtra State Legislative Assembly 2019
Peer Reviewed-Referred Journal

# महाराष्ट्रातील फेरमांडणीचा प्रयोग : एक मुक्त चिंतन

संदीप तुंडूरवार
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागप्रमुख, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**सारांश**

एका सभेत आचार्य अत्र्यांनी 'महाराष्ट्राला इतिहास आहे व अन्य राज्याना केवळ भूगोल'[1] असे म्हणून प्रचंड टाळया घेतल्या होत्या. विशेषतः भारतीय उपखंडालाच नव्हे तर जगालाच आपआपला इतिहास आहे अन् भूगोल बरेचदा भूगोल स्वतःचे आकलन करायला लावून आपला नेमका इतिहास कसा आहे याचा शोध घेण्यास बाध्य करीत असते. हा संदर्भ सध्याच्या राजकारणाला चरखलपणे लागू पडणारा आहे. प्रदिर्घ वारसा आणि इतिहास असणाऱ्या भारतवर्षातील राष्ट्रीय कॉंग्रेसचा भूगोल सिमांत होत चाललेला आहे आणि त्या गढीतील मठाधिपती जुन्या स्मृतीत विचंरत आपला इतिहास चाचपडून पाहत आहे. भारतात जी स्थिती कॉंग्रेसची तीच 2014 पासुन महाराष्ट्राच्या राजकीय भूमित कॉंग्रेसची झालेली आहे. 2014 च्या निवडणुकीत सत्तेचा विरोधी कौल म्हणून 42 जागा पदरात पडल्या होत्या तर 2019 च्या निवडणुकीत कुठलेही कर्तृत्व नसतांना 44 जागा मिळाल्या त्यातून भूगोल विस्तारल्याचा त्यांना साक्षात्कार होऊ लागला. तुलनेने राष्ट्रवादी कॉंग्रेस मात्र स्व–इतिहास नसतांना आपला भूगोल व्यापक करीत येथील राजकीय अवकाश व्यापू लागला व 2019 च्या निवडणुकीत कॉंग्रेसला मागे टाकीत जवळपास 13 जागा अधिक खचून 54 जागाच्या भरोशावर सत्तात्मक तडजोडीत आणि लाभात यशस्वी ठरला. महाराष्ट्रात जे नवे मन्वंतर घडून आले असे म्हटल्या जाते ते वस्तुतः तर नवे उन्मेषण नसून तो फेरमांडणीचा प्रयोग आहे. त्यामागील पार्श्वभूमी खास करून फेरमांडणीच्या नायकाची समजून घेतील तर त्यातील केवळ खाचखळगेच नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकारणाचा पोत लक्षात येईल. 2019 ची निवडणूक सर्वार्थाने फेरमांडणीची आहे याला मग बळ मिळू लागते. पुलोदचा 1978 चा प्रयोग, 2014 मध्ये विनाशर्त भाजपाला पाठिंबा व 2019 चा प्रयोग हे फेरमांडणीच्या या प्रवासाची सुचकता होय.

**मुळशब्द –** मांडणी, फेरमांडणी, मन्वंतर, इतिहास, भूगोल

## विषयप्रवेश

भारतीय राजकारणात उदारवादी आणि समन्वयवादी दृष्टिकोन असणारे नेतृत्व म्हणून ज्यांचा उल्लेख केल्या जायचा त्यामध्ये नेहरू, शंकरराव देव, बॅ. नाथ पै, अटलबिहारी वाजपेयी, प्रणव मुखर्जी या नावांचा प्राधान्याने समावेश होतो. विशेषतः 1990 च्या कालखंडानंतर जेव्हा आघाडी सरकारांचा प्रयोग सुरू झाला त्यावेळी समन्वय राखू शकणारे प्रसंगी समजूतदारपणा घेऊन दोन पावले मागे येत सत्ता कोसळणार नाही याची काळजी घेणारे परंतु स्वतःच्या राजकीय पक्षाचे मोल कमी होणार नाही याची चाणाक्षत जपणाऱ्या नेतृत्वात शरद पवाराचे नाव अग्रस्थानी आलेत. युपीएची असो अथवा एनडीए प्रणित गठबंधन शरद पवारांच्या नेतृत्वाला मराठीपणाची मर्यादा असूनही ते स्विकारोक्ती ठरू लागले त्यातूनच 'मराठा साम्रज्याचा' अधिपती 'पॉवर ऑफ मराठा' शरद पवार असे समीकरण तयार झाले. या समिकरणाच्या पाठिशी मात्र त्यांची धोरणे, निर्णय आणि प्रयोग हे मात्र जवाबदेही आहे. 2019 च्या निवडणूकी नंतर जो प्रयोग उभा केल्या गेला त्याचे ते केवळ शिल्पकार ठरले नाहीत, तर बहुतांश इंग्रजी वृत्तपत्रांनी शरद पवार विद्यमान राजकारणातील नवे शक्तीस्थळ असून भयगंडाच्या राजकारणाला वळण देणारे राहतील असे सूतोवाच केले. युपीएच्या दुसऱ्या पर्यंत सर्वच आघाडयावर कॉंग्रेस पक्ष आपल्या गुणांनी माघार असताना ते मात्र युपीएच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांना

दिलासादायक वाटत होते तर त्याचवेळी विरोधी पक्षांना हवेहवेसे व आपलेसे वाटत होते ही सर्वमान्यता त्याच्या राजकीय कारकीर्दीतून आलेली होती हे लक्षात घेतले तर ते प्रयोगाचे फेरमांडणीकर्ते ठरू शकतात हे स्पष्ट होते.

म्हाराष्ट्राच्या राजकारणात सुसंस्कृत आणि सभ्य चेहरा असणारे यशवंतराव चव्हाण हे प्रभावी नेतृत्व असताना शरद पवारांचा प्रवेश झाला. ग्रामीण राजकारणातील अक्षरे गिरवून ते तोलामोलाच्या राजकारणीवर्गासमवेत सहज वावरू लागलेत. यशवंतरावाचे राजकीय वारसाधारक म्हटल्या गेले. पुढे मात्र त्यांनाच वळसा घालून वसंतदादाच्या बाजूने गेलेत व अंतिमतः त्याही नेतृत्वाला राजकीय दंगलीतील डाव दाखवून राजकारण आणि सत्ताकारण यांच्यातील महद अंतराचा अनुभव चाखायला लावला. या अनुभवाच्या प्रक्रियेतून 1978 मध्ये इंदिरा गांधीना ऐरणीवर ठेवत महाराष्ट्रात नवा प्रयोग शरद पवारांनी जन्माला घातला. त्याचे नाव पुरोगामी लोकशाही आघाडी.[2] काँग्रेस विरोधकांची ही आघाडी उभी करण्यात सत्ता प्राप्त करण्यात, आणि जनसंघ, शेकाप, समाजवादी, काँग्रेसमधील असंतुष्ट गट यांचा विश्वास संपादन करण्यात त्यांना यश मिळाले. पुरोगामी महाराष्ट्रातील हा नवा पुरोगामी प्रयोग येथील जनतेला रूचला विशेषतः पचला याचे कारण तोपर्यंत समांतर विरोधी पक्षाची सत्ता संपुष्टात आलेली होती. महाराष्ट्र एकीकरण समिती, शेकाप, समाजवादी पक्ष यांचा प्रभाव व सद्दी संपुष्टात आलेली होती.

1960 मध्ये महाराष्ट्र अस्तित्वात आला व 1962 मध्ये विधानसभेची पहिली निवडणूक झाली.[3] महाराष्ट्राचा कलश आणण्यात महाराष्ट्र एकीकरण समितीची मोठी भूमिका होती, जनजागृती होती असे असतानाही पहिल्याच निवडणुकीत जनतेने काँग्रसेच्या बाजूने कौल दिला आणि यशवंतरावांचे नेतृत्व स्विकारलेत तेव्हापासून विरोध पक्षांना सत्तेचा मार्ग गवसला नव्हता तो 1978 च्या प्रयोगाने पूर्ण झाला. हा प्रयोग केंद्र सरकारने लावलेल्या प्रचलित राष्ट्रपती राजवटीमुळे दोन वर्षात मोडीत निघाला मात्र या अयशवीतेमध्ये भविष्यातील अनेक संदर्भ दडलेली होती जी परोक्ष–अपरोक्ष त्या–त्या वेळेस बाहेर पडली.

### प्रयोगशील नेतृत्व

शरद पवार प्रयोगशील नेतृत्वाच्या व्याख्येत बसणारे आहे. रूढ अर्थाने ज्या नेतृत्वाच्या व्याख्या मांडल्या जातात त्यात ते चौकटबध्द होत नाहीत तशा फुटफटया त्यांना लागू करता येत नाही. त्यांची मांडणी आजही विपक्ष, स्वपक्ष, स्वजत, माध्यमे यांना गुढ वाटतात. वक्तव्य दिल्यानंतर तर्क–वितर्काच्या आधारावर धांडोळा घेण्याचा प्रयत्न करतात. 22 नोव्हेंबर 2019 ला रात्री 10 वाजल्यानंतर ते पहाटे 7. 45 पर्यंत जे राजकीय महानाटय घडले त्यात महाराष्ट्राचं नव्हे तर बहुतांश राजकीय जान असणाऱ्या भारतीयांनी हे सर्व शरद पवारांच्या खंबीर पाठिंब्यामुळे घडून आले याची शपथेवार ग्वाही दिली होती. महाराष्ट्रात नव्हे तर भारताच्या राजकारणात शरद पवार काहीही करू शकतात असा जो प्रवाद निर्माण झालेला आहे त्यामागे 1978 च्या प्रयोगाची समीकरणे आहेत व ती आहे त्यामागे 1980 च्या प्रयोगाची समीकरणे आहेत व ती आज वा उद्याही ते असेपर्यंत नष्ट होणर नाही 'एकाचवेळी दिलेला शब्द पाळणारे' अशी त्यांची ख्याती आहे, तर त्याचवेळी 'शरद पवार काहीही करू शकतात' असा विश्वास राखणारी सुध्दा आहेत. ते डावे आहेत की उजवे की मध्यम यांचा अजुनही थांग कुणालाच लागलेला नाही. त्यामुळेच 'मी राजकारणात शरद पवाराचे बोट पकडून आलो असे खुल्या मनाने नरेंद्र मोदी बोलतात' तर 'सोनिया गांधीना त्यांचे संकटमोचक वाटतात'. मुलायमसिंग यादव, ममता बॅनर्जी, अरविंद केजरीवाल, लालुप्रसाद यादव, नितीश कुमार, चंद्राबाबू नायडू, इत्यादिंना ते अजूनही तिसऱ्या आघाडीचे केंद्रात सरकार आणू शकण्यास स्फुर्तीस्थान व आशास्थान वाटतात. प्रकाश करात, सिताराम

येपुरी यांचीही स्थिती यापेक्षा वेगळी नाही. औरंगजेब– आदिलशाही–निजामशाही यांच्या काळात गलितमात्र झालेल्यांना मराठी व्यवस्था प्रकाशकिरणाची वाटत होती. नव्या राजकारणात हे मराठी सूत्र अशा तऱ्हेने आहे. त्यामुळे पवारांच्या प्रत्येक वृत्तीकडे, संवादाकडे अजूनही रहस्याची उकल कशी करावी याच दृष्टिकोणातून पाहिले जाते.

शरद पवारांच्या एकूणच प्रयोगांवर दृष्टिक्षेप टाकल्यास काय दिसते याची चर्चा विद्यमान गुंता लक्षात घेताना तपासण्याची गरज आहे. 1986 मध्ये राजीव गांधीच्या प्रेमापोटी औरंबादेत शरद पवारांनी आपला समाजवादी पक्ष (अर्स) काँग्रेसमध्ये विलीन केला. 1984 ते 1998 या कालखंडात त्यांनी कधी महाराष्ट्र कधी केंद्रात सत्ता शकट चालविले. 1996 ते 2004 या काळात ते विरोधात राहिले तर महाराष्ट्रात 1999 मध्ये सोनिया गांधीच्या विदेशी नागरिकत्वावरून काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली.[4] महाराष्ट्रात काँग्रेसमध्ये उभी फाक पडली. सुधाकरराव नाईक यांच्यासह मातब्बर नेतृत्व बाहेर पडली. यावेळी मराठा नेतृत्वांची संख्या अधिक होती. शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. 1999 मध्ये झालेली विधानसभा निवडणूक चौरंगी ठरली. शिवसेना–भाजपा युतीचा फायदा घेऊन सत्तेवर येईल असा कयास बांधल्या गेला. मताच्या धृविकरणाची गोळाबेरीज पक्ष व माध्यमांनी मांडली मात्र शिवसेना–भाजपाला सत्तेचा बऱ्यापैकी जनाधार प्राप्त होऊनही मुख्यमंत्री पदावरून वाद निर्माण झाला व त्याची परिणती सत्ता गमविण्यात झाली. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सोनिया गांधीच्या विदेशी मुद्यावरून काडीमोड घेतलेला असतानाही अचानक महाराष्ट्रातील सत्ता प्राप्तीकरिता काँग्रेससोबत सलगी केली व तत्कालीन समिकरणांना धक्का दिला. तत्कालीन चित्र शिवसेना 62, भाजप 54, राष्ट्रवादी 71, काँग्रेस 69, माकप व भाकप 06, अपक्ष 26 असे होते.[5] राष्ट्रवादीने दोन जागा अधिक मिळवूनही मुख्यमंत्रीपद मात्र काँग्रेसला दिले व महत्वाची खाती राष्ट्रवादीकडे ठेवलीत. यावेळी सत्ताप्राप्तीचा खेळ एक महिना सुरूच होता. शरद पवारांच्या या प्रयोगाची चर्चा फेरमांडणी करणारे नेतृत्व असा व्हायला हवा होता तो तसा अद्यापही झालेला नाही. शरद पवारांवर थेट टीका करायला कुठलेच पक्षीय नेतृत्व का तयार होत नाही हे त्या मागचे खरे कारण होय. कारण पवार कुणालाही सत्तेचा मुकूट घालू शकतात. महाराष्ट्राचा राजकारणात शरद पवार आणि नितीन गडकरी हे समन्वयवादी नेतृत्व म्हणून पाहू शकतो, गडकरी नेतृत्वाला पक्षीय मर्यादा आहेत तशा शरद पवारांना नाहीत. साधारणतः राजकारणात सत्यता, निष्ठा, विश्वास याला प्रचंड महत्व असते असे म्हटल्या जाते. विद्यमान राजकारणात शरद पवारांच्या भोवती प्रचंड मळभ असतानाही त्यांच्याएवढा विश्वासार्ह नेता नाही असे कवित्व जेव्हा बाळगल्या जाते त्यावेळी भारतातील तो मातीचा गुण समजायचा की जनतेची विचारशिलता हा प्रश्न कायम राहतो. 2004, 2009 च्या निवडणूक काळात आघाडी होऊन सत्ता राखण्यात काँग्रेस–राष्ट्रवादी ला यश आलेत मात्र 2012 पासुन केंद्रातील वातावरण व भारतातील बदलत चालणारे समीकरण यांचा अंदाज शरद पवारांना आला. महाराष्ट्रात अशी वंदता आहे की 'भारतातील बदलत्या राजकारणाचा पहिल्यांदा सुगावा मात्र शरद पवारांनाच लागतो' राजकीय ऋतुचक्राविषयी प्रचंड अदमास असणारे नेतृत्व अशी ओळख आहे. त्यामुळेच अनेक किवंदती पैकी 2019 मध्ये चर्चेत आलेली किंवदती म्हणजे शरद पवारांना 2022 चे राष्ट्रपती पद मिळणार, सुप्रिया सुळेना केंद्रात मंत्रिपद व त्यांच्या सहकाऱ्यांना ईडी वा अन्यपासुन संरक्षण. मात्र उध्दव ठाकरेंना दिलेला शब्द पाळण्याकरिता त्यांनी त्याग केला हे यातून चर्चेत आलेत. 2014 मध्ये शेवटच्या क्षणी एक महिना असताना राष्ट्रवादीने पाठिंबा काढून घेतला. राष्ट्रपती राजवट असताना निवडणूक झाली, यामध्ये पक्षीय बलाबल भाजप 122, शिवसेना 63, राष्ट्रवादी काँग्रेस 41, काँग्रेस 42, अन्य 20 असे होते.[6] मुख्य चारही पक्षांनी स्वतंत्र निवडणूक लढविली. प्रचंड एकमेकांवर चिखलफेक

केली. मनमुटाव घडून आला. निवडणूक निकाल कुणाच्याच बाजूने नसल्याने राष्ट्रवादी पक्षाने बिनशर्त भाजपाला पांठिबा दिला व त्यामुळे देवेन्द्र फडणविस यांचे सरकार सत्तेवर आले. राजकीय विश्लेषणकर्त्यांना व भाष्यकारांना शरद पवारांचा हा मोठा गनिमी धक्का होता. पवारांचे धक्कातंत्र कामी आले. शिवसेना शरण आली व विरोधी पक्षाची भूमिका सोडून सहा महिन्यानंतर जे प्राप्त झाले त्यावर समाधान माणून सत्तेत सहभागी झाली. पवार पुन्हा कुणातरीसाठी तारक ठरलेत. एका नव्या प्रयोगाच्या मांडणीचे शिल्पकार ठरेल. वस्तुतः ती फेरमांडणी होती. शरद पवार 2019 च्या निवडणुका येईपर्यंत भांजपावरील टीकेपासून दूर राहिलेत. तर शिवसेना सत्तेत असूनही विरोधी पक्षाची भूमिका वठवत राहिले, असे असतानाही पुन्हा नव्या फेरमांडणीची गरज का भासली याचा वेध घेणे आवश्यक ठरेल.

## सूत्रपात

2019 ची निवडणूक सत्तात्मक फेरमांडणीच्या दृष्टिने पुढचा टप्पा येईपर्यंत कायम लक्षात राहणारी आहे. फेरमांडणीच्या मागील तत्कालीन स्थिती याकरिता समजून घ्यावी लागते. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस अनिच्छेने का होईना एकत्रित लढले. काँग्रेसचा अभूतपूर्व दुसऱ्यांदा दारून पराभव झाला तर राष्ट्रवादीने आपली पत 2014 च्या तुलनेत व्यवस्थित सांभाळली. मात्र भाजपा–शिवसेना यांची 'ग' ची व्यथा तीव्रतेने बाहेर येऊ लागली. त्याचा पुढचा टप्पा शरद पवारांची संभावना करणे, कल्पीत उदाहरणातून मानसिक वार करणे आणि पक्षीय नेतृत्वाची फळी बांधीत करणे यावर भाजपाने लक्ष केंद्रीत केले. केंद्रातील भाजपाची अभूतपूर्व वापसी, महाराष्ट्रातील अभिजन आणि वर्णजणिय वर्गाचा बहुमुखी पाठिंबा, माध्यमांची पक्षाला पाठराखण, मराठा आरक्षणातून मिळालेला मराठा जनाधार यामुळे शरद पवारांचे राजकारण संपू शकते व त्यांच्या राजकीय चातुर्याची शिबंदी नेहमी करीताच संपवून टाकावयाची या बेतानेच राष्ट्रवादी केंद्रीत राजकारणावर भर देण्यात आला. त्यात राष्ट्रवादी नेत्यांवरील संशय, पकडले जाण्याची भीती, अजित पवारांवरील टांगती तलवार यामुळे राष्ट्रवादी निवडणुकंमध्ये गृहीत धरावी अशी राहणार नाही ही धारणा त्यात मुख्यमंत्र्याचे आक्रमक नेतृत्व, महाजनादेश यात्रा या सर्व घटकांच्या एकत्रीकरणाच्या पार्श्वभूमीवर निवडणुका घोषीत झाल्यात. केंद्रात काँग्रेसचे पानीपत झालेले. महाराष्ट्रात राधाकृष्ण विखे सोडून गेलेत, सभागृहाचा विरोधीपक्ष नेताच पळविल्या गेला. गेल्या सत्तर वर्षाच्या काळात असे दिवस काँग्रेसला पहावे लागले नव्हते. त्यात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा आपल्याच गृहमतदारसंघात जिव्हारी लागावा असा लाजीरवाना पराभव त्यामुळे भाजपाच्या दृष्टीने काँग्रेस खिजगणतीत नव्हती. नेमका हा अतिआत्मविश्वास पक्षांना गाफील ठरला. शरद पवारांवर ईडीची बजावलेली नोटीस या सर्व वातावरणात कळीचा मुद्दा ठरली. शरद पवारांनी प्रत्युत्तर देत आपले दबावतंत्र वापरून स्वतःच ईडीच्या दरबारात हजेरी लावून राजकारणाचा बाजच बदलवून टाकला हे समजून घेण्यात त्याचे निदान करण्यात सत्तावादी कृपण ठरलेत. शरद पवारांमध्ये जुना उत्साह नाही, ते आता प्रभावशाली राहिले नाहीत, मराठा जनाधार खिसकला आहे या उर्मीत निवडणूक तंत्र राबविणारे म्हणून राहिलेत. दुसरे म्हणजे साताऱ्यातून मोठे मताधिक्य घेऊन उदयनराजे भोसले निवडून आलेत. त्यांना हा विजय तत्वाचा वाटला त्यात पक्षाचा वाटा त्यांनी नगण्य समजून खासदारीचा राजीनामा दिला. तिसरे महाजनादेश यात्रेच्या निमित्ताने भाजपाने शरद पवाराच्या घरातच त्यांच्या जवळच्या भावकीच्या नात्यातील लोकांना जाणिवपूर्वक प्रवेश देऊन पक्ष खच्चिकरण करण्याचा प्रयत्न केला. पवारांची रसद संपवायची असा विडा घेतलेल्या राजकीय पक्षाचे स्वरूप यावेळी मात्र सुडाचे कारण होते जे यापूर्वी महाराष्ट्रात घडलेले नव्हते. चवथे निवडणूक काळात 'तेल लावलेला

मल्ल समोरच नाही', 'मी पुन्हा येणार', 'तुरूंग यानंतर नेत्यांनी भरल्या जातील', 'देशभक्त देशद्रोही' या वल्गांनानी येथील वातावरण घूसळून निघालेत. पवारांनी याला मात्र अत्यंत शांततेने घेतले. बाहेर पडलेल्या आपल्या सहकाऱ्यांवर त्यांनी टिका केली नाही. आमची वाणी मधुर असायला हवी आणि कृती बलशाली असायला हवी ही बॅ. नाथ पै ची मात्रा शरद पवारानी लक्षात घेतली व काही बाबी निश्चित केल्यात एक, बारामतीतून बाहेर पडताना सांगितले 'निवडणूक होईपर्यंत मी परत येणार नाही, दोन, प्रचारात मांडलेली मुद्दे राजकीय राहील याची खबरदारी घेतली, तीन, 'ईडी पिडी' ची मला भीती वाटतं नाही. उत्तर 'ईडा–पिडा टळो व बळीचे राज्य येवो' या घोषणेने सामान्यांना दिलासा मिळाला. विशेषतः चवथे, संदर्भ महत्वाचे ठरलेत साताऱ्यातील भाषणात दोन गोष्टी झाल्यात एक 'मान गादीला मत मात्र राष्ट्रवादीला' आणि दुसरं भर पावसात छत्री न घेता एखाद्या लढवय्याप्रमाणे जोशपूर्व सभा शरद पवारांनी गाजविली. तरूणांना लाजवेल असा उत्साह त्यात दिसला. त्यांची चित्रफीत समाजमाध्यमावर गाजू लागली. 'अंशी वर्षाचा तरूण तेल लावून कुस्ती खेळण्यास सिध्द आहे' अशी घोषणा झाली. मरगळ संपली निवडणुकीचे निकाल आलेत. भाजपा 105, शिवसेना 56, राष्ट्रवादी काँग्रेस 54, काँग्रेस 44, अन्य 39 अशी संख्यात्मक आकडेवारी बाहेर आली अन् समीकरणे बदलू लागलीत. काँग्रेस–राष्ट्रवादीने बहुमत नसल्यामुळे सरकार बनविणार नाही अशी भूमिका घेतली असली तरी भाजपाने दुखावलेले पवार मात्र अंतरमनातून अस्वस्थ होते. तब्बल 40 दिवस केंद्र व महाराष्ट्राला त्यांनी श्वास रोखून धरण्यास बाध्य केले. याकाळात त्यांच्यातील धुरिणत्व, संयम, हातोटी, प्रक्रिया, प्रशासन, माध्यमांशी अंतर या सर्वच कार्याचा सर्वानाच अनुभव आला. सर्वोच्च न्यायालयातील लढाई, हॉटेलमधील एकत्रीकरण, माध्यमांसमोर 162 चा आकडा असल्याचे प्रदर्शन, अजित पवार वगळता सर्वानाच आपल्या तंबूत माघारी परत आणण्याचे दाखविलेले कसब, दिल्लीतून आमदारांना माघारी आणण्याकरिता सर्वच प्रकारचा वापरलेला पर्याय या सर्वाचा परिपाक सर्वोच्च न्यायालयानाही निर्णय देण्यावाचून पर्याय नाही यामध्ये झाला. निर्णय नेमक्या 26 नोव्हेंबर रोजी येणे, त्यात राज्यपाल, मंत्रीमंडळ, राष्ट्रपती यांची किळसवाणी भूमिका ज्याचे समर्थन पुढील अनेक वर्ष पक्ष म्हणून करता येणार नाही. एखादा व्यक्ती मुख्यमंत्री म्हणून बाहेर का फेकल्या जातो याचे राज्यपाल म्हणून कार्य करतांना भगतसिंह कोश्यारी यांनी जी रेषा आखली त्यातून ते स्पष्ट होते. या सर्वाचा कळत उध्दव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री पदामध्ये झाली हा सर्व प्रवास फेरमांडणीचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'क्रिया आणि प्रतिक्रिया' यावर सुंदर मांडणी केलेली आहे. भारताची जिवनमानस गुलामीत ढकलण्याचे कारणे प्रतिक्रिया वाद्यानी केले असे म्हटले आहे. राजकारणात समुचित मांडणीला जेव्हा नख लावल्या जाते तेव्हा फेरमांडणी करणे क्रमप्राप्त ठरते येथे ठळक फरक एवढाच फेरमांडणी करणारे शरद पवार आहेत व त्यांनी ते स्थान निर्माण करून अबाधित ठेवले आहे. फेरमांडणीतून गर्व, अहंकार, गृहित न धरण्याची प्रवृत्ती जी आहे तिलाच तिलांजली देण्याचे काम शरद पवारांच्या राजकीय प्रवासात सातत्याने दिसून आले आहे, त्यामुळेच त्यांच्यावर विश्वास नाही अशी कुणालाच टीका करता येत नाही. राजकारणात मांडणी एकारलेपणाची वृत्ती दर्शविणारी आहे, तर फेरमांडणी त्यावरचे उत्तर हे लक्षात घेतले तर पवारांच्या फेरमांडणीचे गमक लक्षात येते.

शरद पवारांच्या आता पर्यंतच्या मांडणी व फेरमांडणीवर आक्षेपकर्त्याचे आक्षेप राहू शकतील मात्र यावेळी आक्षेप राहणार नाही तो याकरिता की त्यांनी परंपरागत राजकीय शत्रुत्व जोपासलेल्या पक्षांची एकत्रित मोट बांधून तळातील व सर्वच कार्यकर्त्यांना एक नवा संदेश दिला की 'पक्षकरीता घाम जरूर गाळा मात्र फक्त रक्त सांडवू नका' 'पक्षाकरिता आपल्याच बांधवांच्या नरडीचा घोट घेऊ नका' हा विचार 'राजकीय संस्कृतीकरणाचा आहे' आपण एका प्रजासत्ताक देशाची निवड केली आहे.

घटनेचे राज्य आहे. घटनेने निर्माण केलेल्या तत्वावरून आपले शासन आपण निवडू शकतो त्याकरीता सहभागी होता येते. निवडणुका लढविता येतात, त्यामुळे येथील पक्ष परदेशी नाहीत ते परजिवी नाहीत तेव्हा डोकी फोडण्यापेक्षा डोकी शाबूत राखणारे राजकारण व्हायला हवे हा धडा या निवडणूक निकालानंतर सामोर आला. शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस, सपा, यांचा इतिहास व भूगोल भिन्न–भिन्न आहे. इतिहास भिन्न असताना नवा भूगोल प्रस्थापित करू धजलात ही सर्वाधिक महत्वाची बाब होय जी शरद पवारांच्या फेरमांडणीतून गवसली आहे. बुध्द म्हणाला होता 'संस्कार क्षय असतात' येथे थोडे बदलून म्हणता येईल 'राजकीय पक्षाच्या विचारधारा धुसर असतात त्याचा क्षय होऊ शकतो' त्यामुळे अतिरेकी व आकर्षक अनुनयवादी राष्ट्रवाद मांडणारे, आपल्या परंपरेत जख्ख जखडून ठेवणारे विचार देणारे पक्ष कालसंगत ठरू शकत नाही. महाराष्ट्रात भिन्नता असतानाही शरद पवार, बाळासाहेब ठाकरे, जॉर्ज फर्णांडिस, अंतुले यांची मैत्री सर्वश्रृत होती. पवार–ठाकरे घराण्यांच्या तिसऱ्या पिढीतील आपुलकी मैत्री पाहिली की त्यातून सामान्य कार्यकर्त्याने बोध घ्यावा असे वाटायला लागले तो बोध या निवडणुकीने प्रस्तुत केला हे याचे वैशिष्टय होय व खऱ्या अर्थाने नव्या मन्वतराची ती सुरूवात राहिल ही फेरमांडणी दिर्घकाळ राहील असे नव्हे परंतु नव्या फेरमांडणीचे संकेत महाराष्ट्राच्या भाळी शरद पवारांचे नेतृत्व अबाधित आहे तोपर्यंत कायम राहिल व त्याचा विस्तार नजीकच्या काळात केंद्रातही दिसू शकेल. अनेक घटना, गोष्टी काळाच्या उदरात दडलेल्या असतात यावर सामान्यांचा असणारा विश्वास कधी–कधी प्रत्ययास येतो. तसेच इतिहासाचे एक वर्तृळ आपल्याला बघायला मिळेल. यशवंतराव चव्हाणांना अत्यंत अडचणीच्या काळी प. नेहरूंनी केंद्रात बोलविले व संरक्षण खात्याची जबाबदारी दिली होती. त्यावेळी 'सहयाद्री हिमालयाकरीता धावून गेला'[8] असे म्हटल्या गेले होते. तशीच पुनर्रावृत्ती शरद पवारांच्या फेरमांडणीतून केंद्रात घडले असा कयास बांधणे अनुचित ठरणार नाही. तसेही राजकारणातही 'भविष्यविधान' करण्याची प्रक्रीया लक्षात घेतली तर शरद पवारांची राजकीय फेरमांडणी कालक्षयी आहे असे म्हणता येत नाही. 2019 च्या निवडणुकीचा हा सूत्रपात होय.

## संदर्भसूची

1. शिवाजी कोण होता ?, गोविंद पाणसरे,लोकवाडमय गृह मुंबई, 2016, पृ.क्र. 107.
2. आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, व. म. सिरसीकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2008, पृ.क्र. 187.
3. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, डॉ. शोभा कारेकर, डॉ. शारदा घोडके, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर, 2008.
4. महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रीयेचे स्थानिक संदर्भ,प्रतिमा प्रकाशन, पुणे, सुहास पळशीकर,नितीन बिरमल, 2004 पृ.क्र. 85.
5. महाराष्ट्राचे शासन व राजकारण, रविकिरण साने, नीलिमा साने, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2019, पृ.क्र. 211.
6. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2014 सांख्यिकी अहवाल, भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली, पृ.क्र. 16 ते 19.
7. लोकशाही आराधना, बॅ. नाथ पै, साधना प्रकाशन, पुणे, 2019, पृ.क्र. 117.
8. यशवंतराव चव्हाण कार्य व कतृत्व, डॉ. शरद सांबारे, मेहरबाबा पब्लिकेशन्स नागपूर, 2019 पृ. क्र. 58.